जिल्हा परिषदांकडील लघु सिंचन (जलसंधारण) योजनांच्या व्याप्तीमध्ये वाढ करणे (Enhancement of scope)

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

शासन निर्णय क्रमांकः **जिपसिं २०१३/प्र.क्र.१७२/जल-४**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**

तारीख: **१९ नोव्हेंबर,२०१३**

<u>वाचा —</u>

१) जिल्हाधिकारी,सोलापूर यांचे पत्र क्र. नियोजन/ योजना नाव बदल/संस-1/2013/855, दिनांक 23 मार्च,2013

२) विभागीय आयुक्त,पुणे यांचे पत्र क्र.निशा/का.3/लपायो/2013/177, दिनांक 6 एप्रिल,2013,

३) जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र.राकृयो 2011/प्र.क्र.72/जल-7, दि.9 मे,2013,

४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.जिपाउ/लपावि/ कोपबं/कावि.970/2013, दिनांक 19 ऑगस्ट,2013,

५) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण),पुणे यांचे पत्र क्र.मुअ/ल.सि./(जल)/उविअ-2/प्रशा-6/ संकीर्ण/जिनियो/5539/13, दि.7 सप्टेंबर,2013.

<u>प्रस्तावना —</u>

जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या विविध लघु सिंचन योजना हाती घेण्यासाठी शासनाच्या नियोजन विभागाकडून जिल्हा नियोजन समित्यांमार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. तथापि योजनेच्या नामाभिदानामध्ये “लघु पाटबंधारे” या शब्दप्रयोगामुळे सदर योजनांखाली मिळणारा निधी, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे बांधकाम वगळता इतर कामे उदा. साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध (नवीन), नाला खोलीकरण, नाला सरळीकरण, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, नद्या व नाले जोड, अशी विवक्षित स्वरुपाची नवीन कामे याकरिता हा निधी वापरणे शक्य होत नसल्यामुळे

अनेकदा निधीचा पूर्णत: विनियोग करता येणे अवघड होते. प्रस्तुत लघु सिंचन कामांच्या सीमीत (Limited) समावेशामुळे जलसंधारणाचे नवनवीन उपचार हाती घेण्यावर मर्यादा पडत आहेत. या बाबीचा साकल्याने विचार करुन त्यानुसार सध्या अनुज्ञेय असलेल्या योजनेच्या व्याप्तीत बदल/सुधारणा करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

स्थानिक स्वराज्य संस्थांना जलसंधारण क्षेत्रामध्ये लघु सिंचन योजनांचे अधिक व्यापक काम करता यावे व भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या उपचारामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदांकडील लघुसिंचनाशी (जलसंधारण) संबंधित योजनांच्या व्याप्तीमध्ये (Scope) खालीलप्रमाणे सुधारणा करण्यासाठी याव्दारे, शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.जिल्हास्तरीय योजनेचे सध्याचे नाव : ० ते १०० हेक्टर पर्यंतच्या लघु पाटबंधारे योजनासुधारित नांव : ० ते १०० हेक्टर पर्यंतच्या लघु सिंचन योजना अंतर्गत सर्व प्रकारच्या नवीन लघु सिंचन योजना, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, साखळी सिमेंट कॉंक्रीट बंधारे, नाला खोलीकरण व सरळीकरण इत्यादी नवीन कामे घेता येतील.जिल्हास्तरीय योजनेचे सध्याचे नांव : १०१ ते २५० हेक्टर पर्यंतच्या लघु पाटबंधारे योजनासुधारित नांव : १०१ ते २५० हेक्टर पर्यंतच्या लघु सिंचन योजना अंतर्गत सर्व प्रकारच्या नवीन लघु सिंचन योजना, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, साखळी सिमेंट कॉंक्रीट बंधारे, नाला खोलीकरण व सरळीकरण इत्यादी नवीन कामे घेता येतील.

२. वरील सुधारणा हया योजनांतर्गत नवीन कामे हाती घेण्याच्या मर्यादेपर्यंतच अनुज्ञेय राहतील. अस्तित्वात असलेल्या प्रकल्पाच्या तसेच दुरुस्ती कामासाठी वरील योजनेमधून खर्च करता येणार नाही.

३. वरील सुधारणाचा अंतर्भाव नियोजन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांच्या यादीतील जलसंधारणाशी संबंधित बाबीत करण्यात यावा.

४. त्यानुषंगाने जिल्हा परिषद कार्यक्षेत्रामध्ये लघु सिंचनाचा (जलसंधारण) नवीन कार्यक्रम हाती घेण्यासाठी जिल्हा नियोजन समित्यांना आवश्यक निधी प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात यावा.

५. त्याप्रित्यर्थ वरील नमूद योजनांखाली हाती घ्यावयाची नवीन कामे, त्यांचे निकष, त्यासंबंधीच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रचलित शासन धोरणानुसार राहतील.

६. प्रस्तुत आदेश नियोजन विभागाच्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१११९१४५५४२९६२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Sahebrao Chavan

Digitally signed by Sunil Sahebrao Chavan
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RDD & WATER CONSERVATION DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sunil Sahebrao Chavan
Date: 2013.11.22 16:39:15 +05'30'

**(सुनील चव्हाण)**

महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रत,

१. मा राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव

२. मा मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव

३. मा उपमुखमंत्री महोदयांचे सचिव

४. मा विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

५. सर्व मा.संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य

६. मा जलसंधारण मंत्री महोदयांचे खाजगी सचिव

७. मा जलसंधारण राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव

८. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

९. अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई

१०. प्रधान सचिव (जलसंधारण) मंत्रालय, मुंबई

११. प्रधान सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई

१२. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंरा) मंत्रालय, मुंबई

१३. सर्व विभागीय आयुक्त

१४. सर्व उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई

१५. मा. पालक मंत्री, जिल्हा नियोजन समिती (सर्व)

१६. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, , जिल्हा नियोजन समिती (सर्व)

१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)

१८. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे

१९. अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, (सर्व)

२०. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.

२१. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी , ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई

२२. निवड नस्ती / जल-४